0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.११/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७०/२०११/जा.८२१ दिनांक १४/१०/२०११, ०४/११/२०११ व २४/११/२०११.
३) टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक धर्मराज आर. दुबे तसेच सिनिअर सेक्शन इंजिनियर डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे) श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांचे दि.२५/१०/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.
४) टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक व वाहतुकदार, शिव रोड लाईन्स चे भागिदार धर्मराज रामकेदार दुबे यांचे दि.२९/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७०/२०११/जा.३८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : 29/02/12

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०३/१०/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार डिझेल लोको शेड, कल्याण मध्ये टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ हा डिझेल डिलिव्हरी करीता येणार असून तसेच सदर टँकरमधून डिझेलची चोरी झाल्याच्या खबरीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह सकाळी १०:३० वाजता बातमीच्या अनुषंगाने खातरजमा करण्यासाठी उक्त ठिकाणी वाट पाहत बसले. साधारण ११:५० वाजताच्या सुमारास डिझेल लोको शेडमध्ये टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ व एमएच-४६-एफ-७८८६ हे गेटच्या आत जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी पंचास टँकरच्या मागे चालण्याचा इशारा केला. त्यानुसार अधिकारी व पंच यांनी डिझेल शेडमध्ये प्रवेश केला. गाडीतील चालक यांनी गेटवर नोंद केल्यानंतर इंधन विभाग या ठिकाणी डिलेव्हरी करुन येणारे संबंधित अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश केला. त्यांच्या मागोमाग अधिकाऱ्यांनी देखील पंचासमक्ष प्रवेश केला व उपस्थित सिनियर सेक्शन इंजिनियर श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांना अधिकारी व पंचांची ओळख करुन दिली.

त्यानुसार श्री. जितेन्द्रभाई पटेल, दोन्ही टँकरचे चालक, पंच व अधिकारी वर्ग असे सर्वजण एकत्रितपणे टँकरमधील साठ्याचे मोजमाप करण्यासाठी टँकर, दि कॅन्टीग पॉईंट या ठिकाणी घेऊन आले. त्यानुसार टँकर क्र. एमएच-४६-एफ-७८८६ डि.ओ.सी.क्र. ६४९५८५३६३ व टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ डि.ओ.सी.क्र. ६४९५८५०९५ चे मोजमाप केले. त्याच प्रमाणे दरम्यानच्या कालावधीत डिलेव्हरीसाठी आलेला अन्य टँकर क्र. एमएच-४३-ई-३७१८ डि.ओ.सी.क्र. ०२६५५९ चे देखील मोजमाप करण्यात आले असता, वर नमूद तीन्ही टँकर पैकी टँकर क्र. एमएच-४६-एफ-७८८६ व टँकर क्र. एमएच-४३-ई-३७१८ मधील टँकरच्या कप्प्यातील साठा डिपद्वारे मोजला असता बरोबर आढळून आला. मात्र टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ च्या कप्पा क्र. १, २ व ४ मधील डिझेलचा साठा डिपद्वारे मोजला असता प्रत्येकी ३,००० लिटर याप्रमाणे बरोबर आढळून आला. परंतू कप्पा क्र. ३ मध्ये २९२५ लिटर डिझेलचा साठा आढळून आला. म्हणजेच ७५ लिटर डिझेलचा साठा कमी आढळला. कमी आढळून आलेल्या डिझेलच्या साठ्याबाबत टँकरचे चालक इम्रान मोहम्मद रहेमान खान याच्याकडे विचारणा केली असता, तो काहीही सांगू शकला नाही. तसेच आणखी काही विचारणा करण्यापूर्वीच इम्रान मोहम्मद रहेमान खान, टँकर चालक याने घटनास्थळावरुन पळ काढला. त्याला पकडण्याच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला असता तो सापडू शकला नाही. टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ मध्ये कमी आढळून आलेल्या डिझेलच्या साठ्याबाबत सिनिअर सेक्शन इंजिनियर, डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे), श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे.

अशाप्रकारे टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चा चालक इम्रान मोहम्मद रहेमान खान याने इंडियन ऑईल कार्पोरेशनच्या वाशी टर्मिनल येथून डि.ओ.सी.क्र. ६४९५८५०९५ अन्वेय भरुन घेतलेला टँकरमधील डिझेलचा साठा जसाचा तसा खाली करण्यासाठी मध्य रेल्वेचे कल्याण येथील डिझेल लोको शेड येथे आणण्यापूर्वी मधेच डिझेलची चोरी करुन टँकर खाली करण्यासाठी आणल्याचे निदर्शनास आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच २) दि मोटार स्पिरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिंस्ट्रिब्युशन ॲण्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) आदेश २००५ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द कोळसेवाडी पोलिस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. II ५७/२०११, दि.०३/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ | १ नग | ७,००,०००/- |
| २ | टँकरमधील डिझेल साठा | ११९२५ लि. | ५,०९,४९३/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | टँकरमधील पितळी डिप | १ नग | २,०००/- |
| | | एकूण | १२,११,४९३/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप(अंमल), मुंबई यांनी केलेली असून, कोळसेवाडी पोलिस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. ІІ ५७/२०११, दि.०३/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि.२५/१०/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक धर्मराज दुबे हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र ३ अन्वये लेखी निवेदन सादर करुन ते स्वत: वाहतुकदार असल्यांचे सांगितले. तसेच सिनिअर सेक्शन इंजिनियर डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे) श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.२९/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस शिव रोड लाईन्स चे भागिदार तसेच टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक म्हणून धर्मराज रामकेदार दुबे हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे चालक इम्रान मो. रहमान खान हे उपस्थित राहिले. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांना वारंवार सुचना देऊन देखील ते सुनावणीस अनुपस्थित राहिले अथवा त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाही.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तीवाद :-

दि.२५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक धर्मराज दुबे यांनी युक्तीवाद केला की, ते गाडी क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक असुन ते इंडियन ऑईल वाशी टर्मिनल येथे शिव रोडलाईन्स या फर्मच्या नावे डिझेल व पेट्रोलची ट्रान्सपोर्टिंग करीत आहे. गाडी क्र. एमएच-०४-एच-

४२९९ ही त्याच्या मालकीची असून डिझेल आय.ओ.सी. चे आहे. आय.ओ.सी. चे डिझेल पार्टीकडे पोहचवणे त्यांच्या करारामध्ये आहे. जर माल काही कारणास्तव पार्टीकडे पोहचला नाही. तर तो माल परत आय.ओ.सी. कडे पोहचवावा लागतो. कारण तो माल आय.ओ.सी. कंपनीच्या मालकीचा आहे. तरी कृपया टँकर त्यास व डिझेल आय.ओ.सी. कंपनीस परत करण्यात यावे. टँकरचे पेपर व मालाचे चलन कल्याण पोलिस ठाणे येथे जमा आहे. त्याच्या जवळ असलेली आर.सी.बुक ची छायांकित प्रत तो सादर करीत आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.२५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सिनिअर सेक्शन इंजिनियर डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे) श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांनी युक्तीवाद केला की, दि.०३/१०/२०११ रोजी डिझेल लोको शेड, कल्याणमध्ये टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ हा टँकर डिझेलची डिलीव्हरी करण्याकरिता आला असताना त्यांच्या मागोमाग आलेले शिधावाटप निरिक्षक श्री. धुमाळ व श्री. किरपाणे यांनी मोजमाप केल्यानंतर त्या टँकरमध्ये ७५ लिटर डिझेल कमी आढळल्याने ते टँकर जप्त करण्यात आले होते. आता त्यांना या टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ ची आवश्यकता नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शिव रोड लाईन्स, टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक व वाहतूकदार धर्मराज रामकेदार दुबे यांनी युक्तीवाद केला की, टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ हा टँकर त्याचे स्वत:च्या नावे आहे. परंतू आपले कार्यालया तर्फे नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार त्याचे फर्मचा नमूद टँकर हा मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोळसेवाडी पोलिस ठाणे, जिल्हा ठाणे याचे ताव्यात आहे. तो इंडियन ऑईल कंपनीचा अधिकृत कॉन्ट्रॅक्टर असले कारणाने सदरहू टँकरमधील उर्वरित असलेले डिझेल त्याला कंपनीच्या टर्मिनलमध्ये जमा करावयाचे आहे. सदरहू डिझेल जमा केल्यानंतर त्याला संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात असलेला त्यांचा टँकर पुन्हा ताब्यात देण्यात यावा, असे सांगून इंडियन ऑईल कंपनी लि. या तेल कंपनीचे चलनाची तसेच त्या कंपनीसोबत असलेल्या वाहतुकदार संबंधी करारपत्राच्या छायांकित प्रती सादर करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

CONTROLLER OF RATIONING & ... MUMBAI

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०३/१०/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार डिझेल लोको शेड, कल्याण मध्ये टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ हा डिझेल डिलिव्हरी करीता येणार असून तसेच सदर

टँकरमधून डिझेलची चोरी झाल्याच्या खबरीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह सकाळी १०:३० वाजता बातमीच्या अनुषंगाने खातरजमा करण्यासाठी साधारण ११:५० वाजताच्या सुमारास डिझेल लोको शेडमध्ये टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ व एमएच-४६-एफ-७८८६ हे गेटच्या आत जात असल्याचे दिसून आले. त्यानुसार अधिकारी व पंच यांनी डिझेल शेडमध्ये प्रवेश केला. गाडीतील चालक यांनी गेटवर नोंद केल्यानंतर इंधन विभाग या ठिकाणी डिलेव्हरी करुन येणारे संबंधित अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश केला. त्यांच्या मागोमाग अधिकाऱ्यांनी देखील पंचासमक्ष प्रवेश केला व उपस्थित सिनियर सेक्शन इंजिनियर श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांना अधिकारी व पंचांची ओळख करुन दिली. त्यानुसार श्री. जितेन्द्रभाई पटेल, दोन्ही टँकरचे चालक, पंच व अधिकारी वर्ग असे सर्वजण एकत्रितपणे टँकरमधील साठ्याचे मोजमाप करण्यासाठी टँकर, दि कॅन्टीग पॉईंट या ठिकाणी टँकर क्र.एमएच-४६-एफ-७८८६ डि.ओ.सी.क्र. ६४९५८५३६३ व टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ डि.ओ.सी.क्र. ६४९५८५०९५ चे मोजमाप केले. त्याच प्रमाणे दरम्यानच्या कालावधीत डिलेव्हरीसाठी आलेला अन्य टँकर क्र. एमएच-४३-ई-३७१८ डि.ओ.सी.क्र. ०२६५५९ चे देखील मोजमाप करण्यात आले असता, वर नमूद तीन्ही टँकर पैकी टँकर क्र. एमएच-४६-एफ-७८८६ व टँकर क्र. एमएच-४३-ई-३७१८ मधील टँकरच्या कप्प्यातील साठा डिपद्वारे मोजला असता बरोबर आढळून आला. मात्र टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ च्या कप्पा क्र. १, २ व ४ मधील डिझेलचा साठा डिपद्वारे मोजला असता प्रत्येकी ३,००० लि. याप्रमाणे बरोबर आढळून आला. परंतू कप्पा क्र. ३ मध्ये २९२५ लि. डिझेलचा साठा आढळून आला. म्हणजेच ७५ लिटर डिझेलचा साठा कमी आढळला. कमी आढळून आलेल्या डिझेलच्या साठ्याबाबत टँकरचे चालक इम्रान मोहम्मद रहेमान खान याच्याकडे विचारणा केली असता, तो काहीही सांगू शकला नाही. तसेच आणखी काही विचारणा करण्यापूर्वीच इम्रान मोहम्मद रहेमान खान, टँकर चालक याने घटनास्थळावरुन पळ काढला. त्याला पकडण्याच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला असता तो सापडू शकला नाही. टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ मध्ये कमी आढळून आलेल्या डिझेलच्या साठ्याबाबत सिनिअर सेक्शन इंजिनियर, डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे), श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे. अशाप्रकारे सदर टँकर व त्यामधील डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ मध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, वाशी या तेल कंपनीतून भरलेले १२००० लिटर्स डिझेल हे डिझेल लोको शेड, मध्य रेल्वे, कल्याण येथे जावून वितरण करणे आवश्यक असल्याचे घटनास्थळी आढळून आलेल्या चलन क्र. ६४९५८५०९५ वरुन दिसून येते. तथापी, सदर टँकर चालकाने इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, वाशी या तेल कंपनीतून भरलेले १२००० लिटर्स डिझेलचा साठा जसाच तसा मध्य रेल्वेच्या कल्याण येथील डिझेल लोको शेड येथे पुरवठा करणे आवश्यक असतांना घटनास्थळी अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष प्रत्यक्षात मोजदाद केली असता सदर टँकरमध्ये १२००० लिटर ऐवजी ११९२५ लिटर म्हणजेच ७५ लिटर डिझेलचा साठा कमी आढळून आला याबाबत, कल्याण लोकोशेडचे सिनिअर सेक्शन

इंजिनियर श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात तसेच सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात कमी आढळून आलेल्या डिझेलच्या साठ्याबाबत पृष्टी केलेली आहे. घटनास्थळी अधिकाऱ्यांनी टँकरचे चालक इम्रान मोहम्मद रहेमान खान याच्याकडे विचारणा केली असता, तो काहीही न सांगता व आणखी काही विचारणा करण्यापूर्वीच टँकर चालक इम्रान मोहम्मद रहेमान खान, याने घटनास्थळावरुन पळ काढला. यावरुन टँकर चालकाने टँकर मधील डिझेलचा साठा गैरमार्गाने व स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी चोरी करुन गैरकृत्य केल्याने उपभोक्ताची तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे निष्पण्ण होत आहे. तसेच सिनिअर सेक्शन इंजिनियर डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे) श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल यांनी सुनावणीवेळी केलेल्या खुलाशात टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ या टँकरमध्ये ७५ लिटर डिझेल कमी आढळल्यामुळे ते टँकर जप्त करण्यात आले होते. आता त्यांना या टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ ची आवश्यकता नाही असे नमुद केले आहे. सबब, जप्त करण्यात आलेला टँकरमधील संपूर्ण डिझेलचा साठा ज्या कंपनी मधून भरण्यात आला होता त्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी, नवी मुंबई यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. शिव रोड लाईन्स यांना आय.ओ.सी. कंपनीने डिझेल व पेट्रोल या पेट्रोलियम पदार्थाच्या उपभोक्ताना पुरवठा करण्याकरिता करारबध्द केल्याचे दिसून येते. सदरहू गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ हा वाहतूकदार धर्मराज दुबे यांच्या स्वत:च्या मालकीचा असून या व्यतिरिक्त नेरुळ पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ३०६५/२०११ दि.०८/०९/२०११ अन्वये जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१४९९ हा वाहतूकदार धर्मराज दुबे यांच्या मुलाच्या नावे असून सदर दोन्ही गुन्हा नोंद प्रकरणात नमूद टँकरमधील डिझेलचा साठा उपभोक्तास पुरवठा करण्यापूर्वी गैरमार्गाने डिझेल काढताना आढळून आले आहे. यावरुन मे. शिव रोड लाईन्स या वाहतूकदाराने मे. आय.ओ.सी. कंपनीची विश्वासार्हता गमावल्याचे निषन्न होत आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ या टँकरचे मालक धर्मराज दुबे यांनी सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात, ते गाडी क्र. एमएच-०४-एच-४२९९ चे मालक व शिव रोडलाईन्स चे वाहतुकदार असुन जप्त टँकरमधील डिझेल आय.ओ.सी. चे आहे. आय.ओ.सी. चे डिझेल पार्टीकडे पोहचवणे त्यांच्या करारामध्ये आहे. जर माल काही कारणास्तव पार्टीकडे पोहचला नाही. तर तो माल परत आय.ओ.सी. कडे पोहचावा लागतो. तो इंडियन ऑईल कंपनीचा अधिकृत कॉन्ट्रॅक्टर असले कारणाने सदरहू टँकरमधील उर्वरित असलेले डिझेल त्याला कंपनीच्या टर्मिनलमध्ये जमा करावयाचे आहे. तरी कृपया डिझेल आय.ओ.सी. कंपनीस परत मिळावा तसेच सदरहू डिझेल जमा केल्यानंतर त्याला संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात असलेला त्यांचा टँकर पुन्हा ताब्यात देण्यात यावा, असे सांगितले आहे. तथापी, जप्त टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ मधील डिझेलचा साठा प्रत्यक्षात उपभोक्तास न देता स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील डिझेलचा साठा काढल्याचे आढळून आल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. नमुद

टँकरमधील भरण्यात आलेला डिझेलचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी टँकरचे मालक व वाहतुकदार म्हणून त्यांचीही असुन घटनास्थळी अधिकाऱ्यांना कमी आढळून आलेला ७५ लिटर डिझेलच्या साठयाबाबत त्यांनी स्वत: अथवा त्यांच्या चालकाने काहीच भाष्य न केल्याने सदरच्या गैरकृत्यास त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे आढळून येत असल्याबाबत साशंकता वाटते. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालक यांने त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेली पितळी डीप इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये कोळसेवाडी पोलिस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. II ५७/२०११, दि.०३/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला टँकर क्र.एमएच-०४-एच-४२९९ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

२) अथवा टँकरचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे टँकर लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण डिझेलचा साठा, ज्या कंपनीमधून भरलेला आहे त्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनस, नवी मुंबई यांच्याकडे पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

४) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले पितळी डिप शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी लिलावपध्दतीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चा चालक, इम्रान मोहम्मद रहेमान खान
२) टँकर क्र. एमएच-०४-एच-४२९९ चा मालक व वाहतूकदार धर्मराज दुबे
३) सिनिअर सेक्शन इंजिनियर, डिझेल लोको शेड (मध्य रेल्वे), श्री. जितेन्द्रभाई दुर्लभभाई पटेल
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोळसेवाडी पोलिस स्टेशन, कल्याण यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोळसेवाडी पोलिस स्टेशन, कल्याण यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनल, नवी मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0008